**Shrimad Bhagavad Gita (Abridged) in Marathi**






*- Tataai*

ॐ

# अनुक्रमणिका


| क्रमांक | शीर्षक | कडवी (श्लोक) | ओळी (मूळ) | राग |
|---|---|---|---|---|
| १ | अर्पणपत्रिका | - | - | - |
| २ | श्री गणेश वंदना | ३ | १२ | भूप |
| ३ | अध्याय १: अर्जुनविषाद योग | ७ (४७) | २८(९४) | सारंग |
| ४ | अध्याय २: सांख्य योग | ११(७२) | ४४(१४४) | पुरियाधनाश्री |
| ५ | अध्याय ३: कर्म योग | ९(४३) | ३६(८६) | दुर्गा |
| ६ | अध्याय ४: ज्ञानकर्मसंन्यास योग | ९(४२) | ३६(८४) | बसंतबहार |
| ७ | अध्याय ५: कर्मसंन्यास योग | ९(२९) | ३६(५८) | मालकंस |
| ८ | अध्याय ६: आत्मसंयम योग | ९(४७) | ३६(९४) | तोडी |
| ९ | अध्याय ७: ज्ञानविज्ञान योग | ११(३०) | ४४(६०) | ललत |
| १० | अध्याय ८: अक्षरब्रह्म योग | ८(२८) | ३२(५६) | यमन |
| ११ | अध्याय ९: राजविद्याराजगुह्य योग | ७(३४) | २०(६८) | शिवरंजनी |
| १२ | अध्याय १०: विभूति योग | ६(४२) | २४(८४) | केदार |
| १३ | अध्याय ११: विश्वरूपदर्शन योग | ५(५५) | २०(११०) | भैरव |
| १४ | अध्याय १२: भक्ति योग | ४(२०) | १६(४०) | मारवा |
| १५ | अध्याय १३: क्षेत्रक्षेत्रज्ञविभाग योग | ६(३४) | १२(६८) | कलावती |
| १६ | अध्याय १४: गुणत्रयविभाग योग | ७(२७) | २८(५४) | कल्याण |
| १७ | अध्याय १५: पुरूषोत्तम योग | ६(२०) | २२(४०) | दरबारी |
| १८ | अध्याय १६: दैवासुरसंपद्विभाग योग | ७(२४) | १४(४८) | हंसध्वनी |
| १९ | अध्याय १७: श्रद्धात्रयविभाग योग | ७(२८) | १४(५६) | भीमपलास |
| २० | अध्याय १८: मोक्षसंन्यास योग | १७(७८) | ३४(१५६) | सोहनी |
| २१ | विज्ञापना | ४ | ८ | भैरवी |
| २२ | श्रीकृष्णाची आरती | ४ | १४ | - |
| २३ | गीता महती | ६ | २४ | - |

ॐ

# अर्पणपत्रिका

कृपाघन योगेश्वर श्रीकृष्णाच्या कृपेने ...

दयाघन सद्गुरू श्रीस्वामीसमर्थांच्या आशीर्वादाने ...

महर्षी वेदव्यास (मूळ श्रीमद् भगवद्गीता),
जगद्गुरू श्रीशंकराचार्य (शांकरभाष्य),
बालयोगी श्रीज्ञानेश्वर माउली (ज्ञानेश्वरी),
देशभक्त लोकमान्य श्री टिळक (गीता रहस्य),
आणि आधुनिक संत श्री विनोबा (गीताई);
यांना वाट पुसत व त्यांच्याच
पाचामुखी (अर्थात् पाचाग्रंथी) प्रेरणेने ...

सौभाग्यवती व चि. पुत्रद्वयांच्या मदतीने ...

नातेसंबंधी, इष्ट मित्र व कुलोपाध्याय यांच्या सदिच्छेने ...

पवित्र ग्रंथ श्रीमद् भगवद्गीतेचा
मायबोली मराठीत सारांश रूपाने केलेला
(आणि सौ.ने सुमधुर चाली देऊन विविध रागांत गाईलेला)
हा स्वैर (परंतु सुरेल) गीतबद्ध अनुवाद:

**कृष्णाई**
अर्थात्
**श्रीमद् भगवद्गीतीका**

**ती.रू.कै. मातापित्याच्या चरणी**
**सप्रेम व सविनय समर्पित**.

त्यांनीच गीतामृताची गोडी बालपणी लावली म्हणून
जगन्नियंत्याच्या कृपेस पात्र होण्याचा योग आला व
सदर सत्कृत्य घडण्याचे निमित्त होऊ शकलो.

श्रीकृष्णार्पणमस्तु |

- नारायण स. बुरकुले
अमेरिका, डिसेंबर २५,'९८
(पौष शु. ७, शके १९२०)

ॐ

# श्री गणेश वंदना

(राग: भूप)

हे श्री गणनायका
देई सूर या पाईका
गाईन ही संगीतिका
वंद्य जी तीही लोकां ||धृ.||
हे श्री गणनायका ...

वेदव्यासे मुळात कथिली
तव शुभ हस्ते तुवा जी लिहीली
ज्ञानेशाने स्वये निरूपिली
मोहविते जी सदा सकळिकां ||१||
हे श्री गणनायका ...

महाभारतामध्ये घडली
महाऋषीने समरी रचिली
युगंधराच्या मुखे प्रकटली
वदवी ती मम मुखे गीतिका ||२||
हे श्री गणनायका ...

१०/०५/'९५

ॐ

## अध्याय १: अर्जुनविषाद योग

(राग: सारंग)

धर्मक्षेत्र ते कुरूक्षेत्र ते युद्धक्षेत्र जरी झाले
रथी अतिरथी महारथी नि धारातीर्थी पडले
सुकर्म शाश्वत टिके कुकर्म जाई सदा निंदिले
नित्य निरंतन असे चिरंतन सत्य जगा उमगले

महायुद्ध हे महाभारती पुराणकाळी झडले
अठरा औक्षहिणी सैन्य नि रणी मरण पावले
प्रचंड त्याचे परीणाम तव उदंड जरी भासले
कृपाघनाचे कृपामृत परी उदया तिथेच आले

सज्ज होऊनी शंख फुंकूनी पार्थ आर्जवी कृष्णा
चल मोक्याच्या जागी आपुला रथ घेऊनी मोहना
कौरव पांडव उभय तटीची बघू दे मज ही सेना
उमगू दे ते जमले कोण इथे मारण्या कोणा

परंतु पाहूनी सुप्रिय प्रपिता पुत्र पौत्र सन्मित्र
सगे सोयरे संधी संबंधी शस्त्रसज्ज सर्वत्र
कृपाचार्य गुरू द्रोणाचार्य सर्व स्वजन गणगोत्र
उभे ठाकले परस्परां ते सन्मुख इत्र तत्र

गळूनी गेले अवसान नि विरला रणउन्माद
घेरुनी आली घोर निराशा भरला मनी विषाद
युद्धाचे या पर्यवसान सर्वनाश निरपवाद
स्वजन मारुनी राज्य भोगणे पार्था भासे प्रमाद

जिंकूनी ज्यांच्यासाठी आणू आपण जग हे सर्व
नावाजूनी प्रताप आपुला जयां वाटेल गर्व
मरण इच्छिती तेच आपुले गणगोत गुरुवर्य
शत्रुविहीन हे युद्ध कसे की भासे पाप कुकर्म

कंठी शोष थरकाप शरीरी द्विधा मनी जाहला
कुंठितमति अती शोकमग्न तो कुंतीपुत्र बोलला
निरर्थ भासे जीवन सारे मारो कौरव मजला
खिन्न पार्थ मग शस्त्र टाकूनी मौन रथी बैसला

०९/२०/’९८

(मूळ संस्कृत श्लोक: ४७)

ॐ

## अध्याय २: सांख्य योग

(राग: पुरियाधनाश्री)

भ्रम नव्हे हा मम मित्राचा अखिल मानवी दृष्टीचा
हेरूनी हे मनी बोले हसूनी कर्ता सृष्टीचा
वृथा विचारी कसा गुंतला कृतीवीर तू धीराचा
झटक पटल हे निराशेचे सोड मार्ग अविचाराचा

क्षत्रीय तू वीरोत्तम तुझा धर्म युद्ध करण्याचा
क्षण नव्हे हा योग्य करण्या खल पाप पुण्याचा
विमोह त्यागूनी कर म्हणोनी दृढ निश्चय युद्धाचा
जिंकूनी भोगी मही मरूनी वा मार्ग धरी स्वर्गाचा

मत क्षणिक तत्त्व शाश्वत असा समज शास्त्रांचा
क्षणभंगूर भ्रम सत्य चिरंतन गर्भितार्थ वेदांचा
योग्य अयोग्य एक उपाय सोपा ते कळण्याचा
उचित धर्म अनुसरणे अनुचित मार्ग अधर्माचा

स्वकर्मी रत नित्य राहणे नको ध्यास परिणामांचा
उमग मग हे सुटेल गुंता चिंताग्रस्त मनीचा
मृत्यू जन्मता अटळ नि होई पुनर्जन्म मृताचा
मिळो गती रणी अगणित वीरां शोक काय मग त्याचा

सखे रिपु तव अगण्य तरीही आत्मा एकची त्यांचा
मेले जरी ते सारे होई नाश न त्या आत्म्याचा
धरी तो सोडी काया नवी वास न करीता नित्याचा
जुना टाकूनी लेवी जसा नर साज नव्या वस्त्रांचा

अमर अव्यक्त नित्य निश्चित आत्मा प्रत्येकाचा
जळे सुके ना तुटे कधी तो घात न होई त्याचा
घेण्यासाठी वेध अवध्य निराकार आत्म्याचा
ध्यास अवश्य भक्ती सांख्य वा ज्ञान कर्म योगाचा

धर्म विसरूनी कर्म टाळूनी व्यर्थ वाद वेदांचा
महापूरी बुडल्या विहीरीत शोध जसा पाण्याचा
धर्मविदित मार्ग धरूनी स्वकर्म कौशल्याचा
समत्व बुद्धी राखूनी घ्यावा युक्त वेध योगाचा

..२

म्हणे अर्जुन कळे न मज मार्ग योग विद्येचा
सुखदु:खी स्थिर राखी बुद्धी गुण त्या स्थितप्रज्ञाचा
वदे मधुर वाणीने मग तो प्राणसखा पार्थाचा
ऐक सांगतो एक एक तुज गुणविशेष त्या योग्याचा

धरी कामना एक मनी ना स्पर्श नसे भीतीचा
करी राग न अनुराग कधी तो मेरू संयमाचा
अंकित करूनी सर्व इंद्रिये ध्यास नि अध्यात्माचा
धरूनी तो अवलंबी मार्ग नित्य योग अभ्यासाचा

तल्लीन होता विषयांमध्ये उगम हीन कामाचा
कामातूनी उपजे क्रोध मूलाधार जो मोहाचा
मोही गुंतता बुद्धी लोपते विनाश बुद्धीभ्रष्टाचा
असे अटळ हे जाणूनी योगी शोधी पथ शांतीचा

भोग भोगूनी अलिप्त राही ज्ञानी शांत मनाचा
मोह त्यागी तो ईशचिंतनी योगी मग्न सदाचा
राहूनी जो निष्काम निस्पृह घेई ध्यास समाधीचा
अधिकारी तो जाण निश्चित अढळ ब्रह्मपदाचा

१०/१५/’९८

(मूळ संकृत श्लोक: ७२)

ॐ

## अध्याय ३: कर्म योग

(राग: दुर्गा)

बुद्धी जर ती थोर कृतीहूनी
घालिसी का मज भरी श्रीहरी
युद्धाच्या या सांग निश्चिती
म्हणे अर्जुन करू काय मी

वदे कृष्ण नच भिन्न काहीही
नाणे एक पण बाजू दोन्ही
ज्ञानावाचूनी घडे न कृती
मिळे ज्ञान नि कर्म करूनी

जाणूनी घे तू एक आणखी
शके न राहू कोणी प्राणी
केल्याविण कृती काहीतरी
असे स्पष्ट ही विश्वप्रकृती

कर्मबाध्य जीवन मानवी
धर्मबाध्य पण कर्म वाजवी
मृत्यू भला स्वधर्मी राहूनी
योग्य न कर्म धर्म सोडूनी

धर्म मेळवी ज्ञान नि कृती
धर्म पाळिता निवड निश्चिती
उचित कर्म नि विज्ञानाची
सोय तीच इंद्रियदमनाची

इंद्रिये कर्मा सोकावती
सुखासीन ती चैनी बनती
आवरूनी त्यां लावी सुकर्मी
ज्ञानी तो संयम आचरूनी

...२

..२..

कर्मी  राहूनी  कर्मातूनी
होई वेगळा फळ त्यागूनी
झुंज रणी कर्तव्य म्हणूनी
गुण दोष ते मज अर्पूनी

भिऊ नको तू तू नच पापी
काम क्रोध जर तुज न वेढती
स्वैर ज्यांमुळे इंद्रिये सुटती
टाळूनी ज्ञाना मना मोहिती

मन थोर ते इंद्रियांहूनी
बुद्धी थोर परी मनाहूनी
प्रभू थोर तो त्यां सर्वांहूनी
भजता त्यासी मिळते मुक्ती

१०/३०/’९८

(मूळ संस्कृत श्लोक: ४३)

ॐ

## अध्याय ४: ज्ञानकर्मसंन्यास  योग

(राग: बसंतबहार)

कर्मयोग हा योग पुरातन
सूर्य उमगला मज उपासून
वदे कृष्ण मग सूर्यापासून
मनूने घेतला तो समजावून

मनूने दिली दीक्षा राजांना
सूर्यकुळीच्या महाभागांना
प्रसन्न तुज मी ती देताना
जिवलग मम तू भक्त अर्जुना

नको  बावरू  गूढ  हे  नसे
अतिप्राचीन मी जरी न भासे
जन्म न मज कधी मरण नसे
मायेने  मी  रूप  धरीतसे

धर्म  लोपूनी  अधर्म  पसरे
जगी जेव्हां या सुकर्म ओसरे
खल निर्दाळूनी टिकविण्या बरे
धर्म रक्षिण्या मग मी अवतरे

टिके समाज धर्म पाळून
व्यक्ती जगे नि कर्म करून
वर्ण निर्मिले मी म्हणून
अनुसरिता ते सार्थ जीवन

नसे परी मज बंधन काही
नाकर्ता मी करून सर्वही
जाणूनी हे रहस्य सदाही
भजे मला तो प्रिय मलाही

..२

वेद सांगती यज्ञ कराया
कर्मफळाची आहुती देण्या
म्हणूनी सिद्ध हो कर्म कराया
होमी मोह नि संग्रामी या

योगी मुनी ते यज्ञी अर्पिती
द्रव्य नि जपतपाची आहुती
सांसारिक परी कर्मी गढूनी
मोक्ष मिळविती मला स्मरूनी

ज्ञानाविण जगी श्रेष्ठ काही ना
कर्माविण ते ज्ञान मिळे ना
कर्ममग्न त्या ज्ञानवंतांना
बांधिती कर्मे कोणतीही ना

११/०५/’९८

(मूळ संस्कृत श्लोक: ४२)

ॐ

# अध्याय ५: कर्मसंन्यास  योग

(राग: मालकंस)

सांगे पुन्हा मग तो यदुराया
ऐक अर्जुना भिन्न असे ना
संन्यासी नि भाविक भोळा
लक्ष्य एक पण मार्ग वेगळा

एक करी त्याग कर्माचा
गुंते परी तो कर्मी दूजा
धरे एक पथ समाधीचा
ध्यास दुज्याला मम पदाचा

कर्माविण संन्यास कशाचा
संयम असता दोष कशाचा
शिवे पाप ना धर्मकृतीला
दव भिजवी का कमलदलाला

राहूनी संसारी जो सोडी
राग द्वेष नि पुण्य जोडी
भोगूनी सर्व अलिप्त राही
भक्त मम तो जसा यतीही

कार्यकारण भाव पाहूनी
कर्म करीती आस धरुनी
अज्ञानी ते ते न जाणती
परमात्म्याची थोर महती

ज्ञानाने पटे ओळख प्रभूची
वाट बिकट परी ती ज्ञानाची
हर्ष खेद सुख दुःख भेदूनी
चाले ती तो संयमी ज्ञानी

... २

.. २ ..

कर्म करीता विषय आवडे
   काम क्रोध विषयांतूनी जडे
जिंकूनी त्यांना जाई पलीकडे
   भक्त येई तो सहज मजकडे

योगी मुनी संन्यासी वेगळे
   ध्यान धरीती मिटूनी डोळे
जिंकूनी काम क्रोध मोह ते
   श्वास रोधिती समाधीमध्ये

जप तप त्यांचे मला आवडे
   भक्त जसा मज घाली साकडे
दोघांनाही  शांती  लाभते
   दोघेही मज प्रिय सारखे

११/०६/’९८

(मूळ संस्कृत श्लोक: २९)

ॐ

## अध्याय ६: आत्मसंयम योग

(राग: तोडी)

ऐक अर्जुना म्हणे नारायण
संन्यासाचा मार्ग कठीण
योगी धरी ना संकल्पाविण
विरक्त करूनी धर्माचरण

दिसे सर्वत्र एकची आत्मा
हितशत्रू तो कधी हितकर्ता
मित्र बने तो त्यास जिंकिता
वैरी परी वश त्यासी होता

साधक संन्यासी हे जाणूनी
जिंकी इंद्रिये ज्ञान मिळवूनी
समान सोने माती मानूनी
करी भेद ना सुजनी दुर्जनी

सोडी फलाशा कर्म करूनी
काढी निराशा भय मनातूनी
ओढी चित्त ते चंचल बांधूनी
जोडी चरणी मम मज भजूनी

मनी भासे सम सद्गुण दुर्गुण
तनी लागे सम शीत वा उष्ण
मुनी लक्षी तो ब्रह्म निर्गुण
ध्यानी मग्न नि कर्मनिपुण

सर्वसंगपरित्यागी जसा तो
संयम पाळूनी व्रत आचरितो
टाळूनी सर्वही अतिरेक तो
मित निद्रा आहार राखितो

... २

.. २ ..

पाही विश्व अवघे माझ्यात
दिसे त्यास नि मीच विश्वात
ध्यायी मज जो नित्य चित्तात
मी त्याचा तो माझा निश्चित

साम्ययोग हा ज्यास साधला
जरी या जन्मी थोडा चळला
पुनर्जन्मी यश मिळे त्याला
सहज पावे मग ब्रह्मपदाला

हो योगी तू असा पांडवा
ठेवी न मनी हेवा दावा
समान मानूनी जया अपजया
स्मरूनी मज करी तव कर्तव्या

११/१२/'९८

(मूळ संस्कृत श्लोक: ४७)

ॐ

## अध्याय ७: ज्ञानविज्ञान योग

(राग: ललत)

विसंबूनी मजवरी अर्जुना
जोडी ज्ञान करूनी साधना
समजावितो ज्ञानविज्ञाना
गूढ असे जे मुनिजनांना

मागे मोक्षाच्या लागती किती
मूळ तत्त्व हे परी न जाणिती
मिथ्या सारी विश्वप्रकृती
जरी असे ती माझी निर्मिती

पृथ्वी जल पवन प्रकाश
बुद्धी मन अहंकार आकाश
प्रकृतीत मम यांचा विकास
माया तीच फुंकी प्राणास

या साऱ्या तत्त्वांचे मिश्रण
होता निपजे अखिल जीवन
भिन्न जरी भासे मजपासून
उपज नाशा मी त्यांच्या कारण

शक्तिरूपे जी या विश्वात
माया माझी मी त्यांच्या मुळात
प्राण प्राण्यांत तेज सूर्यात
ॐ वेदी मी आग अग्नीत

सत्त्व रज तम तीन गुण
मम मायेची रूपे जाण
मज न स्पर्शिती कधी पण
टाकिती सारे विश्व वेढून

... २

.. २ ..

दैवी मम ही त्रिगुणी माया
महाकठीण ती तरूनी जाया
भजनी लागे परी जो माझ्या
सहज त्यास ती उल्लंघाया

इतरेजन पण सारे मूढ
ते न जाणिती माया गूढ
राग द्वेष अश्रद्धा ठेवून
ओळखिती ना सत्य सनातन

भजती मज त्यांचे प्रकार
जाण अर्जुना असती चार
आर्त जिज्ञासू ज्ञानी थोर
हितार्थी नि ते चारी उदार

ज्ञानी वरिष्ठ त्यां सर्वांत
मिळे त्याजला ब्रह्म त्वरित
भक्त इतर जरी भ्रमग्रस्त
भजती माझे रूप समूर्त

जशी जशी श्रद्धा वाढते
जन्मोजन्मी जाण जागते
व्यक्तातूनी अव्यक्त कळते
भक्ताला मग मुक्ती मिळते

११/१५/'९८

(३० :मूळ संस्कृत श्लोक)

ॐ

## अध्याय ८: अक्षरब्रह्म योग

(राग: यमन)

ब्रह्म म्हणजे काय माधवा अर्थ काय अध्यात्माचा
कर्म कसे जाणावे जाणे योगी कसा देवाला
अज्ञ तुझा मी भक्त केशवा जरी अल्प बुद्धीचा
सुज्ञ करी मज म्हणे अर्जुन लावी सुमार्गाला

सांगे श्रीहरी जे अविनाशी मूळ सूत्र या विश्वाचे
पार्था जाण ब्रह्म असे ते मूळ तत्त्व सृष्टीचे
घडे सतत जी नित्य अविरत क्रिया येथ कर्म ते
व्यापून अवघे जीवन राही रूप विनाशी मायेचे

वस्तुजात नि प्राणीमात्र जे वसती या विश्वात
प्रत्येकाच्या भाव अनेक असती अंतरात
ओळखूनी स्वभाव म्हणूनी भाव प्रभावी जो त्यांत
चरणी तो मम जोडण्याचा मार्ग असे अध्यात्म

अंतकाळी अंतःकरणी नि प्राणी राखी जो भाव
पुनर्जन्मी मिळे त्याचाची पुनरपि त्याला ठाव
अंत कधी परी कळे न म्हणूनी सदा राखी सद्भाव
झुंज जागता ठेवूनी माझ्या ठायी भक्तिभाव

प्रकटे लोपे यज्ञी असा मी आदिमूळ अधिदेव
अंधकार माझ्यात दिव्य मी सूक्ष्म तरीही भव्य
मूर्त अमूर्त दिवस नि रात्र प्राचीन अर्वाचीन
या सर्वांपलिकडला मी हे जाण सत्य सनातन

बाधिती मज ना कधी मायेचे त्रिगुण त्रिकाळ
अंशाइतुके विश्व मजपुढे विशाल मी विक्राळ
व्यक्त अव्यक्तापलिकडे ते माझे धाम अढळ
फिरे परत ना तिथे पोचता भक्त मम निर्मळ

.. २ ..

परंधामी त्या वसे चिरंतन तत्त्व जे निराकार
उरे विश्व ते पुरे व्यापुनी परब्रह्म अक्षर
मूळ रूप ते मम प्रकाशी दुसरे अंधकार
मायारूपी त्यात विचरती सारे चराचर

विन्धूनी जाण्या विश्व मायावी समाधीत धरी ध्यान
करूनी चित्त एकाग्र नियंत्री हृदयातील श्वसन
ॐ उच्चारूनी योगी जो आणी मस्तकात स्वप्राण
मोक्ष तो मिळवी जसा भक्तही करूनी माझे स्मरण

१०/२१/'९८

(मूळ संस्कृत श्लोक: २८)

ॐ

## अध्याय ९: राजविद्या राजगुह्य योग

(राग: शिवरंजनी)

विश्व वसे हे माझ्यात पार्था
फिरे जसा वायु आकाशी सर्वथा

जीवन सारे स्थिर अस्थिर
मृत्यु  पावता जन्मे सत्वर
फिरे चक्र हे मज न स्पर्शिता
विश्व वसे हे ...

आधार जरी साऱ्या विश्वाचा मी
घडवी मोडी मीच ते प्रलयी
कळे माया ही माझ्याच भक्ता
विश्व वसे हे ...

साकार माझे रूप जो पुजतो
फळे फुले वा जळही अर्पितो
प्रिय होई मज मला भजता
विश्व वसे हे ...

यज्ञी होमूनि समिधा घृत दधी
स्वर्ग मिळविती कुणी राजर्षी
पुनर्जन्म त्यांना पुण्य संपता
विश्व वसे हे ...

वेदाभ्यासी मग्न जे मुनी
ॐकारात विरूनी उन्मनी
मला पावती ते मोक्ष मिळता
विश्व वसे हे ...

श्रेष्ठ साऱ्यांत जाई समजला
अविनाशी माझा भक्तही भोळा
भजे मज जो न कर्मी गुंतता
विश्व वसे हे ...

११/२३/'९८

(मूळ संस्कृत श्लोक: ३४)

ॐ

## अध्याय १०: विभूति योग

(राग: केदार)

सर्वज्ञ तू तू सर्वात्मा
सर्वव्यापी सत्य सर्वेशा
तृप्ती न महिमा तव ऐकता
युगंधरा करी हृदयी राबता

प्रार्थुनी पार्थ आर्जवी कृष्णा
कथी किती विभूती तुझ्या
गोडी अवीट तव अमृत वचना
अविरत पडू दे श्रवणी माझ्या

योगेश्वर तव बोले हसूनी
प्रिय मित्रा मग ऐक फिरूनी
राही भक्त जो मज स्मरूनी
वाही काळजी त्याची सर्व मी

जे जे सुंदर सुभग शुभंकर
उत्तमातले जगी या उत्तम
वस्तू ऋतू स्थिती भाव चराचर
मीच त्यांत प्रकृती पुरूषोत्तम

यां व्यतिरिक्त नीच निकृष्ट
अधले मधले सर्व सुमार
मायी गुंतता होती भ्रष्ट
भजता मज त्यांचाही उद्धार

आदी अंत या विश्वाचा मी
मध्य त्याचा नि मूळ त्याचे मी
व्यापून ते त्याहून दूर मी
सत्य हे जाणे भक्त तोही मी

११'/२५/९८

(४२ :मूळ संस्कृत श्लोक)

ॐ

**अध्याय ११: विश्वरूपदर्शन योग**

(राग: भैरव)

भक्तदेव संभाषणी रची पर्व वेदव्यास
दूरद्रष्टा कथी संजय ऐकी अंध धृतराष्ट्र
हट्ट धरी धनंजय तृप्त न मी श्रवण करून
दावी दयाघना म्हणून विश्वरूप प्रत्यक्ष

चर्मचक्षू परी अक्षम पाहण्या अजस्त्र रूप
दिव्य दृष्टी करी प्रदान पार्थाला कृष्ण म्हणून
क्षणी देखे तव विशाल ईशरूप ते विराट
आदी अंत नसे ज्यास भव्य तेजोवलयात

शत सहस्त्र सूर्य चंद्र ग्रह नक्षत्रे असंख्य
पोटी अग्निज्वाला लुप्त होती पुन्हा प्रज्ज्वलित
कोटी भुजा लक्ष शिरे लवलवती जिव्हा डोळे
अद्भूत पाहण्या रूप भक्त भाग्यवंता मिळे

सुर असुर संत मुनी गंधर्व योगी ऋषी
शूर वीर सारथी रथी सैन्यासह विचरती
अजाणता ते भरडूनी झणी श्रीमुखात जाती
कौरव पांडवही त्यांत स्तिमित पार्थ हे पाहूनी

थरथरत नम्र होत प्रार्थी अर्जुन भिऊन
शंख चक्र गदा धारी धरी तव मूळ रूप
मेले हे सर्व खचित मात्र होई तू निमित्त
युद्ध करी जय निश्चित आश्वासी कृष्ण हसून

११/२८/'९८

(मूळ संस्कृत श्लोक: ५५)

ॐ

## अध्याय १२: भक्ति योग

(राग: मारवा)

भक्त देवाचे असती किती
    असे साऱ्यांवर प्रभूची प्रीती
        देवघेव जी व्यवहाराची
            खूण तीच परी परमार्थाची

शिकवण देई अशी अर्जुना
    प्राणसखा तो जगन्नियंता
        ठेवी जो हृदयी भाव जितुका
            ईश कृपेस पात्र तितुका

यज्ञ समाधी तप साधना
    प्रत्येकाला सोपे साधे ना
        परी न ठेविता मनी कामना
            करी कर्म तो प्रिय मोहना

उते न माते सुखदुःखात
    करी भेद ना वैरीसख्यांत
        कर्ममग्न पण ईशपरायण
            भक्त प्रभूचा तो सर्वोत्तम

११/२९/'९८
(गीता जयंती, शके १९२०)

(मूळ संस्कृत श्लोक: २०)

ॐ

## अध्याय १३: क्षेत्रक्षेत्रज्ञविभाग योग

(राग: कलावती)

समजावी मग भक्ता देव क्षेत्र क्षेत्रज्ञ म्हणजे काय
काया क्षेत्र रूप बाह्य त्यात जो आत्मा तो क्षेत्रज्ञ

परमात्म्याचे आत्मा रूप परी मायेने असे तो लिप्त
पाच तत्त्वांचे बने शरीर  आत्मचेतनेमुळे  जीवित

कायेमुळे भासे आकार मनी उपजती नाना विकार
मायेमुळे विकारग्रस्त मन करी मग बुद्धी भ्रष्ट

बुद्धिभ्रष्ट आत्मा विसरे मूळ स्व-रूप ते परमात्म्याचे
परी मायेचे मळभ सारीता  मीलन होई जीवशिवाचे

अहंभाव असूया टाकूनी राग द्वेष मोह टाळूनी
ईशचरणी चित्त जुंपूनी कर्मपरायण आत्मज्ञानी

ब्रह्मरूपी स्व-रूप न देखे  क्षेत्रज्ञ न तो  क्षेत्री फिरे
भक्ती ज्ञान योगे परी येई सत्यप्रकाशी रूप सामोरे

१२/०२/'९८

(मूळ संस्कृत श्लोक: ३४)

ॐ

## अध्याय १४: गुणत्रयविभाग योग

(राग: कल्याण)

सांग आणखी त्रिगुणांविषयी
श्रीकृष्णाला पार्थ आर्जवी
श्रेष्ठ ज्ञान हे देतो तुला मी
मोक्षदायी जे म्हणे श्रीहरी

पूर्ण ब्रह्म मी सत्य प्रकाश
निर्मी प्रकृती मीच पुरूष
मायावी तिची लक्षणे तीन
सत्त्व रज तम हे त्रिगुण

मी माया नि तिचे ते गुण
सारे अदृष्य आणि अस्पर्श्य
दिसे स्पष्ट पण जसे स्वप्न
निर्मी भासमय माया जीवन

जसा निखळे ग्रह ताऱ्यापासून
गळे अंश मम आत्मा बनून
लिपटे त्रिगुणी माया त्यास
सत्यची भासे मग त्या भास

बुडे डुंबे वा करी पार
आत्मा मायेचा भवसागर
घेऊनी त्रिगुणांचाच आधार
असे ब्रह्मज्ञानाचे सार

सत्त्व वाढता सात्त्विक भाव
वाढे घडे नि पुण्य सुकर्म
रजोगुण करी सत्तालोलुप
घडवी तम स्वार्थ कुकर्म

उत्तम मध्यम नीच त्रिगुण
टाळूनी करी जो माझे स्मरण
आत्मा तो कर्तव्यपरायण
मिळवी मूळब्रह्म निर्वाण

१२/०३/'९८
(दत्त जयंती)

(मूळ संस्कृत श्लोक: २७)

ॐ

## अध्याय १५: पुरूषोत्तम योग

(राग: दरबारी)

समजाविण्या पुन्हा अर्जुना
    चक्रपाणी देई उपमा
अश्वत्थाच्या वृक्षाची त्या
    उफराटा जो जशी माया

शेंडा खाली वरी बुडखा
    भोग पर्ण नि मनीषा शाखा
दिसे पार ना भव्य बुंधा
    वर्णिता वेदज्ञही द्विधा

उन्मूलन करी या वृक्षाचे
    शस्त्र घेऊनी भक्ती ज्ञानाचे
येई धाम मग मम सामोरे
    शिरता ज्यात संपती फेरे

प्राणी वनस्पती मनस्थिती
    प्राण रस नि भाव त्यांत मी
देई मीच विवेक स्मृती
    सजीव निर्जीव सर्वां प्रीती

परी सर्व ही माया प्रकृती
    क्षर अक्षर मम दूजी स्थिती
उभय मी तरी भिन्न उत्तम
    वेद म्हणती मज पुरूषोत्तम

स्वरूप माझे हे पूर्णब्रह्म
    भजूनी मिळवी भक्त मम

१२/०५/’९८

(मूळ संस्कृत श्लोक: २०)

ॐ

## अध्याय १६: दैवासुरसंपद्विभाग योग

(राग: हंसध्वनी)

होई चांगले वागणे जर असती अंतरी चांगले भाव
वागे वाईट प्राणी वसे जर विखार मनी म्हणे माधव

दैवी आसुरी भिन्न भावना विणती नाना मनी वासना
त्यांची प्रेरणा मिळे कर्माला मिळे विवेका थारा मग ना

सत्य अहिंसा शांती नम्रता दया क्षमा सौजन्य शुचिता
दानत निग्रह ज्ञान साधना सद्गुण सारे दैवी संपदा

क्रोध मत्सर दर्प अहंता लोभ अज्ञान दांभिकता
अश्रद्धा असुया निष्ठुरता दुर्गुण हे आसुरी सर्वथा

कर्म घडविती भाव गुण परिणामी ते पाप वा पुण्य
दुष्कर्म पापाचे कारण घडे पुण्य करीता सद्वर्तन

पुण्य कोणते कोणते पाप ओळखण्या आवश्यक ज्ञान
धर्मशास्त्र ज्ञानाचे साधन साधता घडे सदाचरण

कठीण शोधण्या शास्त्राधार मिळे सहजी ना ज्ञान जर
लावूनी विवेकाला कौल कर्म करावे स्मरूनी ईश्वर

१२/०९/’९८

(मूळ संस्कृत श्लोक: २४)

ॐ

## अध्याय १७: श्रद्धात्रयविभाग योग

(राग: भीमपलास)

सांग अजून  सोपे करून  म्हणे अर्जुन  भाव त्रिगुण
दिसे स्पष्ट प्रत्येक कृतीत बिंब गुणांचे सांगे अच्युत

तीन  जनांचे  देवही भिन्न  असुर राजस  सात्त्विक सुर
तामस नि पूजिती पिशाच्च भिन्नही त्यांचे तसे आहार

मधुर माफक रूची सात्त्विक  राजसा रुचे तिख्त दाहक
प्रिय तामसा अन्न निषिद्ध जसा आधाशी सेवी अशुद्ध

यज्ञातही भेद तिघांच्या सात्त्विक करी सोडूनी फलाशा
राजस करी धरूनी मनीषा तामस करी साराची तमाशा

तप तसेची भिन्न तिघांचे सत्य सश्रद्ध सात्त्विकाचे
गौरवास्तव  राजस  घडे  ध्येय  परपीडा  तामसाचे

दानीही वेगवेगळा भाव  निरपेक्ष ते सात्त्विक दान
दान तुच्छतापूर्ण तामस परतफेडीची आस राजस

सार  सुकर्माचे  ॐ तत्सत्  क्रिया सर्व ती ब्रह्मसमर्पित
ॐ उच्चारूनी जी प्रारंभित अंती टिके फलाशाविरहित

१२/१०/'९८

(मूळ संस्कृत श्लोक: २८)

ॐ

## अध्याय १८: मोक्षसंन्यास योग

(राग: सोहनी)

भेद संन्यास त्यागामधला वासुदेव कथी अर्जुनाला
त्याग सोडणे कर्मफलाशा संन्यास विराम कर्माला

कठीण कर्मसंन्यास सर्वथा त्यागही तीन प्रकारांचा
कारण ऐक त्रिगुणी क्रिया प्रसवी भिन्न तीन फळांना

मुळातच क्रियेच्या प्रत्येक असती कारणे पाच निश्चित
अहंकार अधिष्ठान साधन दैव आणि क्रिया साक्षात

सत्त्व रज तमानुसार घडता क्रिया निपजे फळ
जसा फळाचा त्या प्रकार त्याच प्रकारे घडे त्याग

कार्य कारण परंपरा ही चक्र फिरवी सतत नियती
पुनर्जन्म मरण रहाटी प्राणी सर्व म्हणूनी फिरती

जसा गुण तो भाव तसाही भाव घडवी क्रियाही तशी
दैव क्रियेच्या परिणामी दैव तसे सद्गती दुर्गती

कठीण कळण्या माया प्रकृती म्हणून केली मी वर्णनिर्मिती
गुणानुसार वरती प्राणी वर्ण कर्म आपुली नियती

वर्ण कर्म धर्म ठरविती हरेक जीवाची दैव नि गती
करी कृती पण फळ ना हाती हतबलता ही प्रत्येकाची

येई शरण मला म्हणून धर्म वगैरे सर्व सोडून
झुंज ऐकूनी माझे वचन सदा करीन मी तव कल्याण

धर्म यज्ञ समाधी योग माया मोक्ष तत्त्वज्ञान
साधे सोपे या सर्वांहून माझ्या ठायी भक्तिसमर्पण

सुलभ आपुले हे संभाषण करील याचे जो अध्ययन
प्रिय मला तो तुझ्यासम तोही जो याचे करी संकीर्तन

... 2

तुला कळावे तव कर्तव्य न डळमळता तू घ्यावा निर्णय
सांगितले उलगडून म्हणून गूढातले गूढ हे ज्ञान

असेल जर संशय निमाला कर वाटे जे योग्य अर्जुना
पुनित रोमहर्षित कौन्तेय वदे धन्य मी जनार्दना

मोहविमुक्त संशयत्यक्त भाग्यवंत मी तुझा भक्त
तृप्त पिऊन तव ज्ञानामृत झुंजाया श्रीधरा मी सिद्ध

असा संवाद रोमहर्षक व्यासकृपेने ऐकी संजय
संग्रामाचे करण्या वर्णन धृतराष्ट्रसारथी बनून

धर्म कर्म योगाचे गूढ योगेश्वराच्या मुखे प्रत्यक्ष
ऐकून धन्य धन्य संजय रहस्य हे जग उद्धारक

म्हणे मग तो मज विश्वास नजिक पापाचा खचित विनाश
जेथ धनंजय हृषीकेश विजय तेथ नि निश्चित यश

१२/२२/'९८

(मूळ संस्कृत श्लोक: ७८)

ॐ

## विज्ञापना

(राग: भैरवी)

श्रीकृष्ण श्रीकृष्ण स्मरूनी
जाऊ सारे माया तरूनी ||धृ.||

दयाघना हे विश्वंभरा या विश्वाचा तूच आसरा
भक्तजन हो भजा याला संसारी नि दुःखे विसरा ||१||

दुष्ट असो कोणी दुर्जन बनो तोही संत सज्जन
करीता कृती ईशार्पण करी क्षमा तो कृपाघन ||२||

मार्ग मोक्षाचे भिन्न असती श्रेष्ठ साऱ्यांत देवभक्ती
वसो नारायण सर्वां हृदयी मिळो प्रत्येका सुखशांती ||३||

इति |

# कृष्णाई

अर्थात्

## श्रीमद् भगवद्गीतीका

श्रीकृष्णार्पणमस्तु |

हरि: ॐ तत् सत् |

१२/२३/'९८

ॐ

## श्रीकृष्णाची आरती

जय देव जय देव जय वासुदेवा
आरती ओवाळू तुज गोपालकृष्णा ||धृ.||
जय देव जय देव ...

शैषवी सेवी ईश दही दूध तूप
शिषुमुखी दावी मातेस भव्य विश्वरूप
किशोर होता रचे रास राधेसह गोप
रक्षी गोप गोपी गोकुळ उचलूनी गोवर्धना ||१||
जय देव जय देव ...

सांदीपनी चरणी अर्पी अढळ गुरूनिष्ठा
वधूनी चाणूर कंसा धाडी यमसदनी दुष्टां
सेवूनी सुदाम्याचे पोहे सुहृदा देई प्रतिष्ठा
पुरवूनी वस्त्रे पांचालीला करी कौरव निर्भत्सना ||२||
जय देव जय देव ...

समरी हलवी सूत्रे करी न धरीता शस्त्रांना
सांगूनी गीता पार्था करी धर्मसंस्थापना
योगेश्वर तू युगे युगे प्रकटे सज्जनरक्षणा
नेई उद्धरूनी भक्तजना नारायणा ||३||
जय देव जय देव ...

०६/१९/'९७

# गीता महती

गीता एक महाग्रंथ
तत्त्वज्ञान गीतबद्ध
ज्ञानामृते ओतप्रोत
स्वये ईश्वरे कथित

"सज्जन संरक्षण
दुर्जन  निवारण
धर्म पुनर्स्थापन
कारणे सनातन

त्यांसाठी पुनःपुन्हा
होई अवतार माझा,"
सांगे कृष्ण परमात्मा
वर्णी तेची भगवद्गीता

"असो संतशिरोमणी
पंडित वा ज्ञानी मुनी
असो मूर्खशिरोमणी
अथवा  सुमारबुद्धी

जो श्रद्धा मनी ठेवील
भक्तिसाधना  करील
मजला शरण येईल
त्याचा भार मी वाहील."

श्रीकृष्णाचे हे वचन
गीतेत ठेविले लिहून
प्राचीन काळापासून
मानवा असे  वरदान

- ताताई
०२/०२/'१२

ॐ

# कृष्णाई



अर्थात

## श्रीमद्भगवद्गीतीका

—ताताई